# ग्रामीण विकास केंद्र,जामखेड
# व
# इकोनेट,पुणे

# "भटक्या-विमुक्त,आदिवासी, दलित, वंचित समुहातील एकल महिलांची सर्वांगीण माहिती व त्यांचा अभ्यास"

संशोधक- ग्रामीण विकास केंद्र,जामखेड जि.अ.नगर व इकोनेट,पुणे

# ऋणनिर्देश

भटक्या-विमुक्त,आदिवासी, दलित, वंचित समुहातील एकल महिलांची सर्वांगीण माहिती व त्याचा अभ्यास करण्यासाठी हा प्रबंध लिहणे गरजेचे असल्यामुळे सन २०१९-२० या वर्षातील ६ महिन्याच्या कालावधीमध्ये तयार केला आहे. "**भटक्या-**

| अ.न. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|

**विमुक्त,आदिवासी, दलित, वंचित समुहातील एकल महिलांचा सर्वांगीण अभ्यास" ता.श्रीगोंदा, कर्जत, जामखेड जि.अ.नगर** हा विषय निवडून संशोधन अहवाल पूर्ण केला आहे.

हा संशोधन अहवाल विषय निवडीपासून ते पूर्ण होई पर्यंत जे सहकार्य, मार्गदर्शन, प्रोत्साहन **तसेच भटक्या-विमुक्त,आदिवासी, दलित, वंचित समुहातील एकल महिलांचा सर्वांगीण अभ्यास करताना मला व माझ्याबरोबर या संशोधनात काम करणाऱ्या ता.श्रीगोंदा, कर्जत, जामखेड जि.अ.नगर या ठिकाणच्या कार्यकर्त्यांना विचार मांडण्याची जि संधी दिली त्या बद्दल इकोनेट, पुणे यांचे मन:पूर्वक आभारी आहे.**

तसेच ज्यांच्या शिवाय हा संशोधन अहवाल पूर्ण होऊ शकत नव्हता, अशाविषया संबधित तथ्य संकलित करण्यासाठी ता.श्रीगोंदा, कर्जत, जामखेड जि.अ.नगर या ठिकाणच्या निवडलेल्या कार्यक्षेत्रातील एकल महिलांनी केलेल्या यासहकार्या बद्दल त्यांचे मन:पूर्वक आभारी आहे.

**तसेच हा संशोधन अहवाल तयार करण्यासाठी कार्यकर्त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणाऱ्या इकोनेट, पुणे येथील गौरीताई भोपटकर, सुनिता देशमुख, स्वप्नील नेवाळे सर, विंदाताई महाजन तसेच इतर सहकारी यांचेही मन:पूर्वक आभार.तसेच ग्रामीण विकास केंद्र, जामखेड या संस्थेतील सर्वच सहभागी सहकार्यांचे मन:पूर्वक आभार.**

**तसेच हा अहवाल पूर्णत्वास नेण्यासाठी विशेष परिश्रम घेतल्या बद्दल सचिन भिंगारदिवे यांचे मन:पूर्वक आभार.**

**ग्रामीण विकास केंद्र,जामखेड**

Gramin Vikas Kendra

| | | |
|---|---|---|
| १) | प्रास्ताविका | |
| २) | सर्वसाधारण माहिती | |
| ३) | कौटुंबिक माहिती | |
| ४) | आरोग्य विषयक माहिती | |
| ५) | उपजीविका व संपत्ती माहिती | |
| ६) | शिक्षणाविषयी माहिती | |
| ६) | पोलीस यंत्रणा व न्यायालयीन प्रक्रिया | |
| ७) | जातपंचायत | |
| ८) | इतर माहिती | |
| ९) | मुलाखत प्रश्नावली | |


# अनुक्रमणिका

Gramin Vikas Kendra

प्रस्तावना –

आज समाजाचा विचार करताना या समाजामधील एक अविभाज्य घटकम्हणून स्त्री कडे पहिले जाते. समाज घडवताना स्त्रीचा वाटा पुरुषा प्रमाणेच महत्त्वाचा आहे. म्हणजेच स्त्री शिवाय सामाज्याची व्यख्या पूर्ण होत नाही.तसेच समाज घडवण्यामध्ये स्त्रीचे योगदान पुरुषापेक्षा जास्त आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.कारण समाज घडवण्यामध्ये महिलेचे महत्त्वपूर्ण योगदान असते,तिच्या योगदाना शिवाय किंवा तिच्या अस्तित्वाशिवाय समाज पूर्ण होऊ शकत नाही.त्यामुळे स्त्री समाजातील महत्त्व पूर्ण घटक आहे.

परंतु समाजामधील चालीरीती–परंपरा यामुळे स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे.यामध्ये शहरी भागातील स्त्रिया व ग्रामीण भागातील स्त्रीया याच्या समाजातील स्थानामध्ये खूप तफावत आढळते. शहरी भागातील महिलांची साक्षरता व जनजागृती तसेच शहरीकरणामुळे महिलांच्या राहणीमान व विचारामधील बदल तसेच शहरी भागातील पुरुषांमधील पुरुषांच्या विचारामधील बदल या कारणामुळे या दोन ठिकाणच्या महिलांमध्ये बदल आढळतात.

पूर्वी पासून महिलांच्या विकासाच्या दृष्टीने काम करणाऱ्या अनेक थोर लोकांनी आपले आयुष्य हे महिलांना पुरुषाप्रमाणे समान वागणूक मिळवण्यासाठी व तिला माणूस म्हणून जगण्यासाठी खर्ची केले.यामध्ये सावित्रीबाई फुले,जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यासारख्या अनेक थोर लोकांनी आपले पूर्ण जीवन हे महिलांच्या विकासाठी घालवले व त्यांच्या वर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध आवाज उठवला तसेच त्या काळच्या प्रस्थापित रूढी–परंपरा यांना कडाडून विरोध करून कर्मठ चालीरीती बंद करण्यासाठी प्रयत्न केले.

पूर्वीच्या काळी पतीचे निधन झाल्यावर त्या पुरुषाच्या पत्नीने त्याच्या चितेवर सती जाण्याची पद्धत असो किंवा डोक्यावरचे केस काढणे असो, शुभ कार्यामध्ये विधवा महिला असणे अशुभ मानणे, पुनर्विवाह न करण्याचे प्रथा असो की बाल विवाह असो अश्या अनेक प्रथा या थोर माणसांनी संपुष्टात आणण्यासाठी आपल्या जीवाचे रान केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भारताच्या राज्यघटने मध्ये स्त्रियांसाठी भरीव कायदे करून स्त्रियांना माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी संविधान कायद्यामध्ये लिहून जणू स्त्रियांना या जुन्या–बुरसटलेल्या प्रथा–परंपरा–चालीरीती पासून मुक्त केले असे म्हणावे लागेल.डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे स्वतंत्र जगता यावे यासाठी व त्यानाही पुरुषा प्रमाणे समान हक्क मिळावे,त्यांनाही अनेक गोष्टीचा लाभ घेऊन प्रगती करता यावी यासाठी

Gramin Vikas Kendra

संविधानामध्ये भरीव अशी तरतुदी करून त्यांना योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

आज आपण कितीही म्हणालो की,पूर्वीची परस्थिती आणि आजची परस्थिती हि खूप वेगळी आहे,परंतु आजही काही प्रमाणामध्ये जुन्या प्रथा व चालीरीतींना महत्त्व आहे.आणि त्या चाली रीताना चालू ठेवण्यासाठी समाजातील काही समाज कंटक प्रयत्नशील असतात.हे कटू सत्य आपणास अमान्य करून चालणार नाही.जग अतिशय वेगाने बदलत चालले आहे असे जरी आपण म्हणत असलो तरी ते काही ठिकाणचा अपवाद वगळता म्हणावे लागेल.ग्रामीण भागात आजूनही जुन्या चालीरीती काही प्रमाणामध्ये जोपासल्या जात असल्याने त्या ठिकाणच्या महिलांना त्यामुळे आपले स्वातंत्र्य गमवावे लागत आहे.आणि आजही ग्रामीण भागामध्ये स्त्रीला दुय्यम स्थानच दिले जाते हे सत्य अमान्य करून चालणार नाही.

आज भारतीय संविधाने स्त्रीला पुरुषाप्रमाणे जरी हक्क आणि अधिकार दिलेले असतील तरी ते हक्क-अधिकार समाज किती मान्य करतो यावरही काही गोष्टी अवलंबून असतात.कारण जर समाज्याच्या विरोधामध्ये आवाज उठवल्यास समाज आपल्याला कुठल्या नजरे पाहिलं किंवा आपल्यावर बहिष्कार टाकतो की काय या प्रश्नामुळे स्त्रिया मुकाट्याने हे सर्व सहन करत असतात.

पूर्वी पासून समाज्यातील स्त्रीयाचे असलेले समाजातील दुय्यम स्थान आणि त्यामध्ये भटक्या-विमुक्त, आदिवासी, दलित समाजातील महिला असल्यास आजुनच अडचण म्हणजे ज्या समाजाला आजूनही समाज व्यवस्थामध्ये म्हणावे तसा मान दिला जात नाही सामावून घेतले जात नाही.किंवा आजूनही पूर्वी प्रमाणेच वागणूक देऊन हिणवले जाते तसेच त्यांना समाजातील इतर महिला प्रमाणे समजले जात नाही किंवा हक्क दिले जात नाही अश्या महिलांची स्थिती खूप भयानक आहे.जुन्या चालीरीतींना धरून बसलेले काही गावातील जुने लोक व उच्च-निच पाळणारा इतर वर्ग हा कायमच या भटके-विमुक्त, आदिवासी, दलित समाजातील लोकांना व महिलांना कमी लेखण्याचा प्रयत्नामध्ये असतात. या समाजातील लोक या लोकांना कधीही राजकीय, सामाजिक, आर्थिक धोरणामध्ये या लोकांचा विचार करताना आढळत नाही.किंवा त्यांचे म्हणणे विचारामध्ये घेताना आढळत नाही.

या आभ्यासामध्ये भटके-विमुक्त, आदिवासी, दलित, वंचित घटकातील एकल महिलांचा आभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.या अभ्यासामधून या भटके-विमुक्त, आदिवासी, दलित, वंचित घटकातील एकल महिलांचे प्रश्न कितपत समोर येतील व त्याची भयानकता कशी असेल हे सांगणे सोपे असले तरी प्रत्यक्षातील परस्थिती खूप भयानक अनुभवयास मिळते.कारण अभ्यास करत असताना आपण निवडलेला गट हा

समाज व्यवस्थेने नाकारलेला घटक आहे.आणि आपण ज्या पद्धतीने या महिलांची माहिती घेतो ती माहिती सांगताना या महिला कितपत खरे सांगतात किंवा त्यामध्ये कितपत सत्यता आहे हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.कारण या महिला समाजाच्या भीतीने आपल्यावर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराची वाच्यता कुठेही न करता झालेला अन्याय निमुटपणे शन करताना प्रत्यक्ष आढळते.तसेच समाज आपल्याला नावे ठेवील की काय या भीतीने या महिला मन मोकळे पणाने बोलताना आढळत नाही. तसेच त्या ज्या ठिकाणी वास्तव्य करतात त्या ठिकाणची परस्थिती या महिलांच्या या वागण्याला कारणीभूत ठरते.कारण घरामधील सासू-सासरे, दीर-भावजया किंवा नंदा आपल्याला काय बोलतील किंवा आपले भाऊ-वहिनी, आई-वडील काय बोलतील या भीतीने या महिला खरे सांगताना आढळत नाही.यामध्ये काही महिला अपवाद असतात.ज्या महिला अपवाद असतात त्या महिला निर्भीड पणे आपल्या समस्या मांडताना आढळतात.कारण या महिलांनी अनेक अत्याचार सहन केलेले असतात.

आपला समाज भटके-विमुक्त, आदिवासी, दलित, वंचित घटकातील एकल महिलांशी कशा पद्धतीने वागतो.तसेच या महिलांच्या विकासामध्ये कशा पद्धतीने अडचणी निर्माण करतो या विषयी या अभ्यासाच्या माध्यमातून समोर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.या अभ्यासामधून या महिलांची नक्की स्थिती काय आहे हे पाहण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील खर्डा, मिलिंदनगर-कुंभारतळे, आरोळे वस्ती या ठिकाणच्या तर कर्जत तालुक्यातील रेहकुरी-वालवड, मिरजगाव, कर्जत शहर, जलालपूर श्रीगोंद्या तालुक्यातील पारगाव, ढोकराई, श्रीगोंदा कारखाना, आणि बेलवंडी कोठार अशा ११ गावामधील भटके-विमुक्त, आदिवासी, दलित, वंचित घटकातील एकूण ४०० एकल महिलांचा अभ्यास करण्यात आला आहे.यामध्ये ज्या महिलांचे वय १८ ते ५५ वर्षापर्यंत आहे अशा एकल महिलांचा अभ्यास करण्यात आला आहे.

यामध्ये ज्या महिलांच्या पतीचा मृत्यू झालेला आहे किंवा एखाद्या महिलेला तिच्या पतीने सोडून दिलेले असेल किंवा पतीच्या त्रासाने पत्नीने तिच्या पतीला सोडलेले असेल तसेच पतीने काही ८-९ वर्षापासून बेपत्ता झालेला असेल त्याचे प्रमाणपत्र पोलिसाकडून मिळालेले असेल तर,किंवा एखाद्या मुलीचे लग्नाचे वय होऊन गेलेले असते परंतु काही कारणामुळे त्या मुलीचे लग्न झालेले नसेल तर ती एकल मध्ये समाविष्ट होते.तसेच देवाला सोडण्याच्या प्रथेमध्ये असलेली मुरळी तसेच तृतीय पंथी हे एकल मध्ये मोडले जातात.

या अभ्यासामध्ये विशेष करून भटके-विमुक्त, आदिवासी, दलित, वंचित घटकातील एकल महिलांचा सर्वांगीण अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.यामध्ये या

महिलांची वैवाहिक स्थिती, त्या महिलेच्या सासर व माहेरची मालमत्ता-जमीन, तिचा उत्पनातील वाटा, असणारा व्यवसाय, उत्पन्न, पतीचे मृत्यू कारण, घरातील व्यक्तींचे आजार, उपजीविकेचे साधन, न्यायालयीन प्रकिया, पोलीस स्टेशन तक्रारी, शिक्षण, मुलांचे शिक्षण, कर्ज, त्यांचे स्वप्न, विविध योजना, पुनर्विवाह,पतीने किंवा पत्नीने सोडल्याचे कारण, जातपंचायत, राहण्याचे ठिकाण, नागरिकत्वाचे पुरावे अशा स्वरूपाचा सर्वांगीण अभ्यास यामध्ये केलेला आहे.

यामधून या भटके-विमुक्त, आदिवासी, दलित, वंचित घटकातीलएकल महिलांच्या विकासाच्या दृष्टीने व त्यांची स्थितीची माहिती मिळवण्यासाठी हा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे.भविष्याच्या दृष्टीने या समाजातील एकल महिलांबरोबर काम करण्यासाठी किंवा त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी या एकल महिलांच्या जीवनाचा सर्वांगीण अभ्यास करणे गरजेचे आहे.

Gramin Vikas kendra

## १) वैवाहिक स्तिथी

एकल महिला विषयी अभ्यास करताना त्यांची वैवाहिक स्तिथीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.त्यांची वैवाहिक स्तिथी समजल्यास त्यांची वर्गवारी करणे सोपे जाते .म्हणून हा प्रश्न अभ्यासात घेण्यात आला आहे.

| अ.क्र. | वैवाहिक स्तिथी | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | **विधवा** | ३०८ | ७७% |
| २ | **परीताक्त्या** | ७४ | १८.५% |
| ३ | **घटस्फोटीत** | ११ | २.८% |
| ४ | **इतर** | ७ | १.८% |
| | **एकूण** | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते कि,या निवडलेल्या क्षेत्रात विधवा महिलांची संख्या जास्त ७७% आहे.त्या नंतर परीतक्ता महिलांची संख्या १८.५%, घटस्फोटीत महिलांची संख्या २.८% तसेच इतर म्हणजेच प्रौढ कुमारिका/इतर महिलांची संख्या १.८% आहे. म्हणजेच वरील अभ्यासातून निवडलेल्या कार्यक्षेत्रात एकल महिला मध्ये विधवा महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे हे निदर्शनात येते.

Gramin Vikas Kendra

२) सासरी किती एकर जमीन आहे

एकल महिलांच्या अभ्यासामध्ये ज्या एकल महिला आहेत (विधवा,परीतक्ता, घटस्फोटीत) त्यांच्या सासरी किती जमीन आहे हे समजणे या आभ्यासामध्ये महत्त्वाचे आहे.कारण ज्या वेळी या महिलांच्या भविष्याचा विचार केला जातो त्या वेळी सासरी असणाऱ्या मालमत्ता,जमीन याचा विचार केला जातो.कारण त्या मालमत्ता मध्ये या महिलेच्या पतीच्या निधनानंतर किवां काही कारणास्तव पती-पत्नी विभक्त झाल्यावर त्या ज्या ठिकाणी नांदण्यास म्हणजेच सासरी होत्या किवा आहे त्या सासरी किती जमीन आहे हे माहिती होणे महत्त्वाचे असते,म्हणून हा प्रश्न आभ्यास मध्ये महत्त्वाचा वाटतो.

| अ.क्र. | जमीन गुंठे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १-१० गुंठे | १ | ०.३% |
| २ | ११-२० गुंठे | ४ | १.०% |
| ३ | २१-३० गुंठे | २ | ०.५% |
| ४ | ३१-४० गुंठे | ८ | २.०% |
| ५ | ४१-५० गुंठे | ६ | १.५% |
| ६ | ५१ गुंठ्यापेक्षा जास्त | ७४ | १८.५% |
| ७ | लागु नाही | १ | ०.३% |
| ८ | जमीन नाही | ३०४ | ७५.०% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात कि,अभ्यासासाठी निवडलेल्या क्षेत्रात सासरी जमीनच नसणाऱ्या महिलांची संख्या ७५.०%(३०४) आहे.तर १८.५%(७४) महिलांच्या सासरी ५१ गुंठ्याच्या पुढे जमीन आढळते.तसेच ३१-४० गुंठे जमीन सासरी असणाऱ्या महिलांची संख्या २.०%(८),४१-५० गुंठे जमीन सासरी असणाऱ्या महिलांची संख्या १.५%(६), ११-२० गुंठे जमीन सासरी असणाऱ्या महिलांची संख्या १.०%(४), २१-३० गुंठे जमीन सासरी असणाऱ्या महिलांची संख्या०.५%(२), १-१० गुंठे जमीन सासरी असणाऱ्या महिलांची संख्या०.३%(१), हा प्रश्न लागू नसणाऱ्या महिलांची संख्या ०.३%(१)आहे.

३) जमीन सामाईक आहे की विभक्त (सासरी)-:

एकल महिलांच्या अभ्यासामध्ये सासरी असणाऱ्या जमिनीची माहिती असणे महत्त्वाचे आहे.या मध्ये असणारी जमीन ही सामाईक आहे कि विभक्त आहे हे

Gramin Vikas Kendra

माहिती असणे गरजेचे कारण असणारी मालमत्ता ही किती व्यक्ती मध्ये सामाईक आहे कि फक्त सासरच्या मालकीची आहे हे माहिती असणे महत्त्वाचे आहे म्हणून हा प्रश्न आभ्यासामध्ये घेणे गरजेचे वाटते.




वरील वर्तुळावरून असे लक्षात येते कि,एकल महिलांचा अभ्यास करताना त्या एकल महिलांच्या सासरी असणारी जमीन सामाईक आहे का विभक्त आहे याचा अभ्यास करताना.७० (१७%) एकल महिलांच्या सासरी असणाऱ्या शेतीचा प्रकार हा सामाईक आहे.२४ (६%) एकल महिलांच्या सासरी असणाऱ्या शेतीचा प्रकार विभक्त आहे.तर ३०६ (७७%) एकल महिलांच्या सासरी असणाऱ्या जमिनीचा प्रकार त्या महिलांना लागू नाही किंवा त्यांना शेती नाही असे लक्षात येते.

४) सासरी शेतीचा प्रकार कोणता आहे.

एकल महिलांचा अभ्यास करताना एकल महिलेच्या सासरी असणारी शेती बागायती आहे कि जिरायती आहे याचा आभ्यास करणे गरजेचे असते कारण यावरून

त्या कुटुंबाची आर्थिक स्थिती लक्षात ये किवा त्या जमिनीचे मूल्यमापन होत असते तसेच त्या कुटुंबाचे या वरून उत्पन्न ठरत असते.कारण जिरायत शेतीमधून मिळणारे उत्पन्न कमी असते व बागायती शेती मधून मिळणारे उत्पन्न हे जास्त स्वरूपाचे असते.म्हणून हा प्रश्न आभ्यास मध्ये महत्त्वाचा वाटतो.

| अ.क्र. | शेती प्रकार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बागायती | २९ | ७.३% |
| २ | जिरायत | ६६ | १६.५% |
| ३ | लागू नाही | ३०५ | ७६.३% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणीवरून असे लक्षात येते कि,एकल महिलांच्या सासरी असणाऱ्या शेतीच्या प्रकारामध्ये २९ (७.३%)एकल महिलांच्या सासरी बागायती जमीन आहे.तसेच ६६ (१६.५%)एकल महिलांच्या सासरी जिरायती जमीन आहे.तर ३०५(७६.३%) एकल महिलांना हा प्रश्न लागू नाही.

५) वार्षिक उत्पन्न किती आहे. (सासरी असणारे)

५) वार्षिक उत्पन्न किती आहे. (सासरी असणारे)

एकल महिलाच्या आभ्यास मध्ये त्या एकल महिलेच्या सासरी असणाऱ्या शेतीची महिती असणे गरजेचे असते यामध्ये शेतीमधून मिळणारे उत्पन्न किती आहे.यावर त्या कुटुंबाची प्रगती अवलबून असते. तसेच या उत्पन्नावर कुटुंबाच्या विकासाच्या दृष्टीने काही नियोजन करता येते.तसेच ती महिला जर सारुपासून विभक्त राहत असेल तर त्या महिलेला या उत्पन्नामध्ये आपला वाटा मागता येऊ शकतो. त्यामुळे सासरी असणाऱ्या शेतीचे उत्पन्न किती याचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

Gramin Vikaskendra




वरील सारणी वरून असे लक्षात येते कि,एकल महिलेच्या सासरी असणाऱ्या शेतीमधून सासरच्या लोकांना किती उत्पन्न मिळते याचा अभ्यास करताना २००००-३०००० हजार रु.उत्पन्न असणाऱ्या एकल महिलांच्या सासरच्यांची संख्या ३५(८.८%) आहे.३१०००-४०००० हजार रु.उत्पन्न असणाऱ्या एकल महिलांच्या सासरच्यांची संख्या २२(५.५%) आहे.४१०००-५०००० हजार रु.उत्पन्न असणाऱ्या एकल महिलांच्या सासरच्यांची संख्या१५(३.८%) आहे.तसेच ५१०००-६०००० हजार रु.उत्पन्न असणाऱ्या एकल महिलांच्या सासरच्यांची संख्या ४(१.०%) आहे.६१०००-८०००० हजार रु.उत्पन्न असणाऱ्याची संख्या१(०.३%) आहे.८१०००-१००००० हजार रु.उत्पन्न असणाऱ्या एकल महिलांच्या सासरच्यांची संख्या ७(१.८%) आहे.१००००० रु. पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या एकल महिलांच्या सासरच्यांची संख्या २(०.५%) आहे.तसेच ३०९(७७.३%) एकल महिलांना हा प्रश्न लागू नाही.तर ५(१.३%) लोकांन जमीन नाही. असे समोर आले आहे.

६) उत्पन्नातील आपला वाटा किती.

एकल महिलाच्या आभ्यासामध्ये या कार्यक्षेत्रात असणाऱ्या एकल महिलाच्या सासरी असणाऱ्या शेती मध्ये या कार्यक्षेत्रात असणाऱ्या एकल महिलाना सासरच्या शेतीमधील उत्पन्नात त्या एकल महिलेचा वाटा किती प्रमाणात आहेया गोष्टीचा आभ्यास करणे अतिशय महत्त्वाचे आहे.त्या मुळे प्रश्न आभ्यासा महत्त्वाचा आहे.

| अ.क्र. | उत्पन्नातील वाटा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २००००-३०००० | ३८ | ९.५% |
| २ | उत्तर दिले नाही | २ | ०.५% |
| ३ | लागु नाही | ३३ | ८.३% |
| ४ | वाटा नाही | ३२७ | ८१.८% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल महिलांचा अभ्यास करताना एकल महिलेच्या सासरी असणाऱ्या शेती मधील उत्पन्नामधील या एकल महिलांचा वाटा किती आहे याचा अभ्यास करताना ३८(९.५%) महिलांचा आपल्या सासरी असणाऱ्या शेती मधील उत्पन्नातील वाटा हा २००००-३०००० हजार रु.आहे.तर २(०.५%) एकल महिलांनी या बाबत उत्तर दिले नाही.तसेच ३३(८.३%) महिलांना हा प्रश्न लागू नाही.तर ३२७(८१.८%) एकल महिलांचा आपल्या सासरी असणाऱ्या शेतीतील उत्पन्नामध्ये वाटा नाही असे समोर आले नाही.

७) सासरी व्यवसाय कोणता आहे

एकल महिलांचा आभ्यास करताना एकल महिलेच्या सासरी कुठल्या प्रकारचा व्यवसाय आहे.या गोष्टीचा आभ्यास करणे महत्त्वाचे आहे.ज्यामुळे या एकल महिलांना त्या व्यवसायामुळे आर्थिक फायदा होऊ शकतो किंवा त्यांना त्या व्यवसायामध्ये आपला हिस्सा मागता येऊ शकतो. व त्यांचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते यामुळे सासरी असणाऱ्या व्यवसायाचा आभ्यास करणे गरजेचे ठरते.

Gramin Vikas Kendra




वरील वर्तुळा वरून असे लक्षात येते की, एकल महीलानाचा अभ्यास करताना त्या एकल महिलांच्या सासरी असणाऱ्या व्यवसायाचा अभ्यास करताना शेती असणाऱ्या सारुच्याची संख्या ९(२.३%) आहे.तर मजुरी असणाऱ्याची संख्या हि ७७(१९.३%) आहे.व्यवसाय असणाऱ्या एकल महिलांच्या सारुच्याची संख्या ३३(८.३%)आहे.तसेच हा प्रश्न लागू नसणाऱ्या एकल महिलांची संख्या १(०.३%) आहे..तर इतर व्यवसाय असणाऱ्या एकल महिलांच्या सासरच्याची संख्या २७८(६९.५%) आहे.व्यवसाय नसणाऱ्याची संख्या २(०.५%) आहे.असे या अभ्यासामधून समोर आले आहे.

८) व्यवसाय कसा आहे सामाईक की विभक्त

एकल महिलांचा आभ्यास करताना एकल महिलेच्या सासरी व्यवसाय असल्यास तो कोणत्या प्रकारचा म्हणजे तो समीईक आहे कि विभक्त आहे या गोष्टीचा आभ्यास करणे गरजेचे असते. आहे.या या मुळे व्यवसाय सामाईक का विभक्त या गोष्टीचा आभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

| अ.क्र. | व्यवसाय कसा | वारंवारिता | टक्केवारी. |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सामाईक | ७९ | १९.८% |
| २ | विभक्त | २० | ५.०% |
| ३ | माहित नाही | १ | ०.३% |
| ४ | व्यवसाय नाही | ३०० | ७५% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते कि,एकल महिलांच्या सासरी असणारा व्यवसायामध्ये ४०० एकल महिला पैकी ७९(१९.८% )महिलांच्या सासरी सामाईक व्यवसाय आहे. तर २० (५.०%) महिलांच्या सासरी विभक्त व्यवसाय आहे.तसेच ३०० (७५%) एकल महिलांच्या सासरी व्यवसाय नाही.तर १(०.३%)एकल महिलेच्या सासरी व्यवसाय सामाईक आहे कि विभक्त आहे हे माहित नाही असे लक्षात येते.

९) व्यवसायातून वार्षिक उत्पन्न किती आहे

एकल महिलांचा आभ्यास करताना एकल महिलेच्या सासरी व्यवसाय असल्यास त्या व्यवसाय मधून किती वार्षिक उत्पन्न मिळते आहे.या गोष्टीचा आभ्यास करणे महत्त्वाचे आहे.कारण उत्पन्नावर त्या कुटुंबाची प्रगती अवलबून असते.

| अ.क्र. | उत्पन्न (०००) | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २००००-३०००० | ६२ | १५.५% |
| २ | ३१०००-४०००० | २७ | ६.८% |
| ३ | ४१०००-५०००० | ७ | १.८% |
| ४ | ५१०००-६०००० | ३ | ०.८% |
| ५ | ८१०००-१००००० | २ | ०.५% |

Gramin Vikas Kendra

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | लागू नाही | १ | ०.३% |
| ७ | माहित नाही | २९८ | ७४.५% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात ये कि,एकल महिलेच्या सासरच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मध्ये ४०० एकल महिलान पैकी २९८(७४.५%) महिलांना हा प्रश्न लागू नाही म्हणजे या महिला सासरी राहत नाही.किंवा त्या महिलांना या विषयी माहिती नाही.तसेच ६२(१५.५%) एकल महिलांच्या सासरी२००००-३०००० रुपयेउत्पन्न आहे.२७(६.८%)महिलांच्या सासरी ३१०००-४००००रु. उत्पन्न आहे.तर ४१०००-५०००० रु.उत्पन्न असणाऱ्या सासरच्या लोकांची संख्या ७(१.८%)आहे.५१०००-६००००हजार रु.उत्पन्न असणाऱ्या एकल महिलांच्या सासरच्या लोकांचीसंख्या ३(०.८%)आहे.८१०००-१००००० हजार रु.उत्पन्न असणाऱ्या सासरच्या लोकांची संख्या २ (०.५%) आहे.तसेच १ (०.३%) महिलांना आपल्या सासरचे उत्पन्न किती आहे याची माहिती नाही.

१०) सासरी असणारे उत्पन्न

एकल महिलांचा आभ्यास करताना एकल महिलेच्या सासरी व्यवसाय असल्यास त्या मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नातून या एकल महिलेचा वाटा किती आहे याचा आभ्यास करणे महत्त्वाचे आहे,कारण व्यवसाया मधील उत्पन्नातकितीही असले तरी या एकल महिलेचा वाटा किती आहे.या गोष्टीचा आभ्यास करणे महत्त्वाचे आहे.म्हणून या प्रश्नाला या आभ्यासाम्ध्ये समाविष्ट केले आहे.



वरील वर्तुळा वरून असे लक्षात येते कि,एकल महिलांच्या सासरी असणाऱ्या उत्पन्नामध्ये त्या एकल महिलाचा वाटा किती आहे हे लक्षात येते.यामध्ये ४०० एकल महिला मध्ये ३१६(७९%) महिलांचा सासरच्या उत्पन्नामध्ये कुठलाही वाटा नाही.तर सासरच्या उत्पन्नामध्ये २००००-३०००० हजार रु.वाटा असणाऱ्या महिलांची संख्या ४३(१०.८%) आहे.तसेच ४१(१०.३%) महिलांना हा प्रश्न लागू नाही.असे समोर आले आहे.

➢ *माहेरी शेती असल्यास*

एकल महिलांच्या अभ्यासामध्ये ज्या एकल महिला आहेत (विधवा,परीतक्ता, घटस्फोटीत,इतर) त्यांच्या माहेरी किती जमीन आहे हे समजणे या आभ्यासामध्ये महत्त्वाचे आहे.कारण ज्या वेळी या महिलांच्या भविष्याचा विचार केला जातो त्या वेळी माहेरी असणाऱ्या मालमत्ता,जमीन याचा विचार केला जातो.कारण त्या मालमत्ता मध्ये या महिलेच्या पतीच्या निधनानंतर किवां काही कारणास्तव पती-पत्नी विभक्त झाल्यावर त्या राहण्यास कधी-कधी माहेरी असतात किवा सासरीच असतात.तसेच माहेरचे लोक त्या एकल महिलेचा सांभाळ करतात किवा कधी-कधी करत नाही त्याच प्रमाणे सासरचे लोकही करतात. त्यामुळे माहेरी शेती आहे कि नाही हा प्रश्न महत्त्वाचा असतो कारण माहेरच्या (वडिलांच्या) ही मालमत्ते मध्ये मुलगा व मुलगी यांना समान अधिकार दिले आहे. म्हणून हा प्रश्न आभ्यास मध्ये महत्त्वाचा वाटतो.

Gramin Vikas kendra

११) माहेरी शेती किती गुंठे आहे

एकल महिलांच्या अभ्यासामध्ये ज्या एकल महिला आहेत (विधवा,परीतक्ता, घटस्फोटीत,इतर) त्यांच्या माहेरी किती जमीन आहे हे समजणे या आभ्यासामध्ये महत्त्वाचे आहे.कारण ज्या वेळी या महिलांच्या भविष्याचा विचार केला जातो त्या वेळी माहेरी असणाऱ्या मालमत्ता,जमीन याचा विचार केला जातो.यामध्ये त्या एकल महिलेच्या माहेरी किती गुंठे जमीन आहे या विषयी माहिती असणे गरजेचे असते त्यामुळे हा प्रश्न आभ्यासामध्ये महत्त्वाचा वाटतो.

| अ.क्र. | जमीन किती गुंठे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ११-२० | २ | ०.५% |
| २ | ३१-४० | ८ | २% |
| ३ | ४१-५० | ८ | २% |
| ४ | ५१ पेक्षा जास्त | १०१ | २५.३% |
| ५ | माहित नाही | १ | ०.३% |
| ६ | लागू नाही | ६ | १.५% |
| ७ | शेती नाही | २७४ | ६८.५% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल महिलांचा अभ्यास करताना असे आढळते की या महिलांच्या माहेरी किती गुंठे शेत जमीन आहे याचा अभ्यास करताना असे आढळले की ११-२० गुंठे जमीन माहेरी असणाऱ्या

एकल महिलांची संख्या २(०.५%) आहे.तर ३१-४० गुंठे जमीन माहेरी असणाऱ्या एकल महिलांची संख्या ८(२%) आहे.४१-५० गुंठे जमीन माहेरी असणाऱ्या एकल महिलांची संख्या ८(२%) आहे.५१ पेक्षा जास्त गुंठे जमीन माहेरी असणाऱ्या एकल महिलांची संख्या१०१(२५.३%)आहे.तर एका एकल महिलेला आपल्या माहेरी किती शेती आहे याची माहिती नाही.तर ६(१.५%) एकल महिलांना हा प्रश्न लागू नाही..तसेच २७४(६८.५%) एकल महिला शेती नाही असे समोर आले आहे.

१२) जमीन कशी आहे

एकल महिलांचा आभ्यास करताना या एकल महिलांच्या माहेरी जमीन असल्यास ती सामाईक आहे का विभक्त आहे या गोष्टीची माहिती असणे गरजेचे असते .कारण असणारी जमीन ही किती व्यक्ती मध्ये आहे किवा ती विभक्त आहे की सामाईक आहेयाचा खुलासा होणे गरजेचे आहे.कारण या जमिनीमध्ये या एकल महिलांचे हिस्सा असतो तसेच पती नंतर किंवा पतीपासून विभक्त झाल्यानंतर हि या जमिनीमध्ये या महिलेचा हिस्सा असल्याने या गोष्टीचा आभ्यास करणे गरजेचे आहे

| अ.क्र. | जमीन कशी आहे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सामाईक | ७८ | १९.५% |
| २ | विभक्त | ३८ | ९.५% |
| ३ | लागु नाही | २८४ | ७१% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल महिलेच्या माहेरी असणारी शेती हि विभक्त किंवा सामाईक आहे याचा अभ्यास करताना एकून ४०० महिलाचा अभ्यास करता ७८(१९.५%)महिलांच्या माहेरी सामाईक शेती आहे.तर ३८(९.५%) महिलांच्या माहेरी विभक्त शेती आहे.तसेच २८४(७१%) महिलांना हा प्रश्न लागू होत नाही.

Gramin Vikas Kendra

१३) शेतीचा प्रकार कोणता

एकल महिलाच आभ्यास करताना या एकल महिलांच्या माहेरी असणारी शेती ही कुठल्या प्रकारची आहे म्हणजेच टी बागायती आहे कि जिरायती आहे या गोष्टीची माहिती होणे गर्जे आहे .या प्रकारावरून त्या जमिनीचे उत्पन्न ठरते त्यामुळे या प्रश्नाचा आभ्यास करणे गरजेचे आहे

| अ.क्र. | शेती प्रकार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बागायती | ४४ | ११% |
| २ | जिरायती | ७३ | १८.३% |
| ३ | लागु नाही | २८३ | ७०.७% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षत येते की,एकल महिलांच्या माहेरी असणारी शेतीचा प्रकार बागायती आहे का जिरायती आहे याचा अभ्यास करताना ४४(११%) महिलांच्या माहेरी बाग्याती शेती आहे तर ७३(१८.३%)महिलांच्या माहेरी जिरायती जमीन आहे.तर २८३(७०.७%) महिलांना हा प्रश्न लागू होत नाही असे आढळून आले.

Gramin Vikas Kendra

१३) माहेरी शेतीचे वार्षिक उत्पन्न किती आहे

एकल महिलाच आभ्यास करताना या एकल महिलांच्या माहेरी शेती असल्यास त्या शेती मधून मिळणारे वार्षिक उत्पन्न किती आहे या गोष्टीचा विचार करणे गरजेचे असते कारण याच उत्पन्नावर त्या कुटुंबाची आर्थिक प्रगती  चांगली असल्यास ते या एकल महिलेले मदत करू शकतात .त्यामुळे एकल महिलेला माहेर कडून मिळणारी मदत या उत्पन्नावर अवलबून असते.

| अ.क्र. | वार्षिक उत्पन्न | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २००००-३०००० | ३५ | ८.८% |
| २ | ३१०००-४०००० | ३३ | ८.३% |
| ३ | ४१०००-५०००० | ३४ | ८.५% |
| ४ | ५१०००-६०००० | २ | ०.५% |
| ५ | ८१०००-१००००० | ५ | १.३% |
| ६ | १००००० पुढे | १ | ०.३% |
| ७ | महित नाही | १ | ०.३% |
| ८ | लागु नाही | २८९ | ७२.३% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात यते की,एकल महिलांचा अभ्यास करताना त्या महिलेच्या माहेरी असणाऱ्या शेतीचे वार्षिक उत्पन्न किती याचा अभ्यास करताना ४०० पैकी ३५(८.८%)एकल महिलांच्या माहेरी २००००-३०००० हजार रु.उत्पन्न आहे.तर ३१०००-४०००० रु. उत्पन्न माहेरी असणाऱ्या महिलांची संख्या ३३(८.३%) आहे. माहेरी ४१०००-५०००० रु. उत्पन्न असणाऱ्या एकल महिलांची संख्या ३४(८.५%)आहे.माहेरीच्या शेतीमध्ये ५१०००-६००००रु. उत्पन्न असणाऱ्या महिलांची संख्या २(०.५%)आहे.तर ८१०००-१०००००रु. उत्पन्न असणाऱ्या महिलांची संख्या हि ५(१.३%)आहे.तसेच १०००००रुच्या पुढे उत्पन्न असणाऱ्या महिलांची संख्या १(०.३%) आहे.माहेरच्या शेतीमध्ये किती उत्पन्न आहे याची माहिती नसणाऱ्या एकल महिलाची संख्या १(०.३%)आहे.हा प्रश्न लागू नसणाऱ्या एकल महिलाची संख्या २८९(७२.३%)आहे.

१४) आपला वाट किती

एकल महिलाच आभ्यास करताना या एकल महिलांच्या माहेरी असणारी शेतीच्या उत्पन्नामध्ये या एकल महिले किती वाटा माहेऱ्याकडून दिला जातो याचा आभ्यास या ठिकाणी महत्त्वाचे वाटते.कारण एकल महिला जर माहेरी राहत असेल तर त्या शेतीच्या उत्पन्नामध्ये त्या महिलेचा असणारा वाट हा महत्त्वाचा आहे.कारण

Gramin Vikas Kendra

वडिलांच्या संपत्तीमध्ये तिचाही तेवढाच अधिकार आहे. त्यामुळे अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासाठी निवडला आहे.




वरील वर्तुळावरून असे लक्षात येते की, एकल महिलेच्या माहेरी असणाऱ्या शेतीच्या उत्पन्नामध्ये या एकल महिलेचा वाटा किती आहे याचा अभ्यास करताना ३४१(८५.३%) महिलांचा वाटा सासरच्या शेतीच्या उत्पन्नामध्ये नाही.तसेच ४२(१०.५%) महिलांना हा प्रश्न लागू नाही.तर २(०.५५%) महिलांनी आपल्या वाट्याबाबत माहिती सांगितली नाही.तसेच माहेरच्या उत्पन्नामध्ये ५१०००-६०००० हजार रु.वाटा असणाऱ्या महिलांची संख्या १(०.३%)आहे.तसेच आपल्या माहेरच्या उत्पन्नामध्ये २००००-३०००० रु.वाटा असणाऱ्या महिलांची संख्या १४(३.५%)आहे असे लक्षात आले आहे.

१५) माहेरी व्यवसाय कोणता आहे

एकल महिलांचा अभ्यास करताना ज्या एकल महिला आहेत त्यांच्या माहेरी कोणता व्यवसाय आहे.याचा विचार करणे गरजेचे आहे.कारण यातील काही एकल महिला या माहेरी वास्तव्यास असतात.किवा त्या एकल महिलेचा माहेरच्या संपत्तीत मध्येपण अधिकार असतो त्यामुळे एकल महिलांच्या माहेरी कोणता व्यवसाय आहे या गोष्टीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

Gramin Vikas

| अ.क्र. | व्यवसाय | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती | २० | ५% |
| २ | मजुरी | ६४ | १६.०% |
| ३ | शिक्षक | १ | ०.३% |
| ४ | नोकरी | १ | ०.३% |
| ५ | व्यवसाय | २० | ५% |
| ६ | सांगता येत नाही | १ | ०.३% |
| ७ | इतर | ३ | ०.८% |
| ८ | नाही | २९० | ७२.५% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,ज्या एकल महिलांचा अभ्यास करण्यात आला आहे त्या एकल महिलेच्या माहेरी कोणता व्यवसाय आहे याचा अभ्यास करताना माहेरी शेती व्यवसाय असणाऱ्याची संख्या २०(५%) आहे.तर मजुरी करणाऱ्याची संख्या ६४(१६.०%)आहे.शिक्षक असणाऱ्याची संख्या १(०.३%)आहे.नोकरी करणाऱ्याची संख्या १(०.३%)आहे. व्यवसाय करणाऱ्याची संख्या २०(५%) आहे.माहेरी कोणता व्यवसाय आहे ये न सांगता येणाऱ्या महिलांची संख्या १(०.३%) आहे.इतर व्यवसाय करणार्याची संख्या ३(०.८%) आहे.तर माहेरी कुठलाही व्यवसाय नसणाऱ्याची संख्या २९०(७२.५%)आहे.

१६) व्यवसाय सामाईक आहे की विभक्त आहे

एकल महिलांचा अभ्यास करताना ज्या एकल महिला आहेत त्यांच्या माहेरी कोणता व्यवसाय आहे.याचा विचार करणे गरजेचे आहे.कारण यातील काही एकल महिला या माहेरी वास्तव्यास असतात.किवा त्या एकल महिलेचा माहेरच्या संपत्तीत मध्येपण अधिकार असतो.परंतु माहेरी असणारा व्यवसाय हा सामाईक आहे कि विभक्त आहे या गोष्टीचा विचार करणे गरजेचे आहे.कारण जार तो विभक्त असेल तर तिला मिळणारा वाटा पण त्या व्यवसायानुसार असणार आहे. त्यामुळे एकल महिलांच्या माहेरी असणारा व्यवसाय हा सामाईक आहे कि विभक्त आहे या गोष्टीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | व्यवसाय प्रकार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|

Gramin Vikas Kendra

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सामाईक | ५५ | १३.८% |
| २ | विभक्त | २१ | ५.३% |
| ३ | महित नाही | ३ | ०.८% |
| ४ | लागु नाही | ३२१ | ८०.३% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल महिलांच्या माहेरी व्यवसाय असल्यास तो सामाईक आहे की विभक्त आहे याचा आभ्यास करताना सामाईक व्यवसाय असणाऱ्याची संख्या ५५(१३.८%)आहे.तसेच विभक्त व्यवसाय असणार्याची संख्या हि २१(५.३%) आढळते तर माहेरी असणारा व्यवसाय हा सामाईक आहे की विभक्त आहे हे माहिती नसणाऱ्याची संख्या हि ३(०.८%)आहे.तसेच हा प्रश्न लागू नसणाऱ्या महिलांची संख्या हि ३२१(८०.३%) आहे.असे या अभ्यासातून समोर आले आहे.

१७) वार्षिक उत्पन्न किती

एकल महिलांचा अभ्यास करताना ज्या एकल महिला आहेत त्यांच्या माहेरी कोणता व्यवसाय आहे.याचा विचार करणे गरजेचे आहे.कारण यातील काही एकल महिला या माहेरी वास्तव्यास असतात.किवा त्या एकल महिलेचा माहेरच्या संपत्तीत मध्ये तिचा पण अधिकार असतो. जर माहेरी व्यवसाय असल्यास त्या व्यवसायातून मिळणारे एकूण उत्पन्न किती आहे.याचा विचार करणे गरजेचे आहे. म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | वार्षिक उत्पन्न (०००) | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २०-३० हजार रु. | ४७ | ११.८% |
| २ | ३१-४० हजार रु | २१ | ५.३% |
| ३ | ४१-५० हजार रु | ५ | १.३% |
| ४ | ५१-६० हजार रु | ३ | ०.८% |
| ५ | सांगता येत नाही | ४ | १% |
| ६ | लागू नाही | ३२० | ८०% |
| | एकूण | ४०० | १००% |

Gramin Vikas kendra

वरील सारणीवरून  असे लक्षात ते की,एकल महिलांच्या माहेरी व्यवसाय असल्यास त्या व्यवसायामधून त्या कुटुंबाला मिळणारे उत्पन्न किती आहे याचा अभ्यास करताना असे लक्षात येते की,२०-३० हजार रुपये उत्पन्न असणाऱ्या एकल महिलांच्या माहेरच्याची संख्या ४७(११.८%)आहे.तर ३१-४० हजार रुपये उत्पन्न असणाऱ्याची संख्या २१(५.३%)आहे.४१-५० हजार रु.उत्पन्न असणाऱ्याची संख्या ५(१.३%)आहे.५१-६० हजार रु.उत्पन्न असणाऱ्याची संख्या ३(०.८%)आहे.तसेच माहेरी असणाऱ्या व्यवसायामधून किती वार्षिक उत्पन्न मिळते हे सांगता न येणाऱ्या महिलांची संख्या ४(१%) आहे.तसेच ३२०(८०%)महिलांना हा प्रश्न लागू होत नाही.हे या अभ्यासामधून समोर आले आहे.

१८) आपला वाटा किती आहे

एकल महिलांचा अभ्यास करताना ज्या एकल महिला आहेत त्यांच्या माहेरी कोणता व्यवसाय आहे.याचा विचार करणे गरजेचे आहे.कारण यातील काही एकल महिला या माहेरी वास्तव्यास असतात.किवा त्या एकल महिलेचा माहेरच्या संपत्तीत मध्येपण अधिकार असतो. तसेच माहेरी असणाऱ्या एकूण संपत्तीतील या एकल महिलेला किती वाटा मिळतो या गोष्टीचा विचार करणे गरजेचे आहे. म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | उत्पन्नातील वाटा (०००) | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २०-३० हजार | १४ | ३.५% |
| २ | ३१-४० हजार | १ | ०.३% |
| ३ | लागु नाही | १ | ०.३% |
| ४ | वाटा नाही | ३८४ | ९६% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की,एकल महिलांचा अभ्यास करताना या महिलांच्या माहेरी व्यवसाय असल्यास त्या व्यवसायमधील उत्पन्नामध्ये या एकल महिलाच वाटा किती आहे याचा अभ्यास करताना २०-३० हजार रु उत्पन्नातील वाटा असणाऱ्याची संख्या१४(३.५%) आहे.तर ३१-४० हजार रु.उत्पन्न

Gramin Vikaskendra

असणाऱ्याची संख्या १(०.३%)आहे.हा प्रश्न लागू नसणाऱ्याची संख्या १(०.३%)आहे.तसेच या माहेरच्या व्यवसायाच्या उत्पन्नामध्ये वाटा नसणाऱ्या महिलांची संख्या ३८४(९६%)आहे असे अभ्यासामधून समोर आले आहे.

## आरोग्य

Gramin Vikas kendra

१८) आपणास/मुलांना काही अपंगत्व अथवा दुर्धर आजार आहे काय

एकल महिलांचा आभ्यास करतानाच त्या एकल महिलांच्या बरोबरच त्यांच्या मुलांचा आरोग्याचा प्रश्नाचा आभ्यास करणे गरजेचे आहे.तसेच या महिलांना किंवा त्यांच्या मुलांना कुठला दुर्धर आजार किंवा कुठल्या स्वरूपाचे अपंगत्व आहे का नाही याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.कारण एकल महिला या पतीपासून वेगळया राहत असतात किवा त्या महिलांच्या पतीचा मृत्यू झालेला असतो.त्यामुळे आभ्यास कर्त्याला या गोष्टीचा आभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

| अ.क्र. | आरोग्य | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३६ | ९% |
| २ | नाही | ३६१ | ९०.३% |
| ३ | महित नाही | ३ | ०.८% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की, एकल महिलांचा अभ्यास करताना त्या एकल महिलांच्या आरोग्याचा अभ्यास करत असताना ३६(९%) एकल महिलांना किवा त्यांच्या मुलांना अपंगत्व किवा दुर्धर आजार आहे.३६१(९०.३%) एकल महिलांना किवा त्यांच्या मुलांना अपंगत्व आहे.तर ३(०.८%) एकल महिलांना या विषयी माहिती सांगता आली नाही.

Gramin Vikas Kendra

२०) आजार असल्यास कोणता आहे

एकल महिलांचा अभ्यास करताना या एकल महिलांच्या कुटुंबाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.यामध्ये या महिलांना जर मुले असतील तर त्या मुलांना कुठला आजार आहेका या बरोबरच आजार असल्यास तो आजार कोणता आहे.या विषयी अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | आजार पण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पोलिओ | १ | ०.३% |
| २ | मतीमंद | २ | ०.५% |
| ३ | कायमस्वरूपी अपंग | ८ | २% |
| ४ | दुर्धर आजार | २६ | ६.५% |
| ५ | लागु नाही | ३६३ | ९०.८% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल महिलांचा अभ्यास करताना या महिलांच्या मुलांना कुठला आजार आहे या बाबत अभ्यास करताना पोलिओ झालेल्या मुलांची संख्या हि १ (०.३%) आहे.तर मतीमंद मुलांची संख्या २(०.५%) एवढी आहे.तसेच कायमस्वरूपी अपंग असणारे मुलांची संख्या ८ (२.%) आहे.तर दुर्धर आजाराने ग्रस्त असणाऱ्या एकल महिलांच्या मुलांची संख्या २६(६.५%) आहे.तसेच एकल महिलांच्या मुलांना आजार नसणाऱ्या किंवा मुले नसणाऱ्या महिलांची संख्या ३६३(९०.८%) आहे.किवा या एकल महिलांना हा प्रश्न लागू नाही. असेसमोर आले आहे.

Gramin Vikas Kendra

२१) आजारी असल्यास खर्च कोण करते

एकल महिलांचा अभ्यास करताना या एकल महिलांच्या कुटुंबाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.यामध्ये या महिलांना जर मुले असतील तर त्या मुलांना कुठला आजार आहेका या बरोबरच आजार असल्यास तो आजार कोणता आहे तसेच या आजारावर कोण खर्च करतात या विषयी अभ्यास करणे गरजेचे आहे.म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | खर्च | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मजुरी करून | २४ | ६% |
| २ | कर्ज काढुन | ३ | ०.८% |
| ३ | दुसऱ्या कडून उसने | १ | ०.३% |
| ४ | सरकारी रुग्णालयात | १ | ०.३% |
| ५ | व्यवसाय करून | ३ | ०.८% |
| ६ | लागु नाही | ३६१ | ९०.३% |
| ७ | नातलग | ७ | १.८% |
|  | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की,अभ्यासामध्ये घेतलेल्या एकल महिलांचे मुले जर आजारी असतील तर त्यांचा आजारी असल्याचा खर्च कोण करतोयाचा अभ्यास या अभ्यासामध्ये करण्याचा प्रयत्न करताना मजुरी करून मुले आजारी असल्यास खर्च भागवला जातो अश्या एकल म्हीलाची संख्या २४(६%) आहे.तर कर्ज काढून खर्च करणाऱ्या एकल महिलांची संख्या ३(०.८%)आहे.दुसऱ्याकडून उसने पैसे घेऊन खर्च करणाऱ्या एकल महिलांची संख्या १(०.३%) आहे.सरकारी रूग्णालयामध्ये दाखल करणाऱ्याची संख्या १(०.३%)आहे.व्यवसाय करून खर्च करणारे ३(०.८%) एकल महिला आहे.तर ३६१(९०.३%) महिलांना हा प्रश्न लागू नाही.तसेच या एकल महिलांच्या आजारी असणाऱ्या मुलांचा आजाराचा खर्च त्यांचे नातेवाईक करतात असे अभ्यासामधून समोर आले आहे.

## रहिवास

२२) सध्या कुठे राहता

एकल महिलांचा अभ्यास करताना या एकल महिलांच्या कुटुंबाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.तसेच या महिला एकल असल्यामुळे त्या सध्या कुठे राहतात या

विषयी अभ्यास करणे गरजेचे आहे.कारण या महिला एकल असल्याने त्या पतीपासून विभक्त झाल्यावर किवा पती मरण पावल्यावर कुठे राहतात या विषयी अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | राहण्याचे ठिकाण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | माहेरी आई वडील | ११५ | २८.८% |
| २ | भावाकडे | २ | ०.५% |
| ३ | इतर | २ | ०.५% |
| ४ | सासरी वेगळे | १८१ | ४५.३% |
| ५ | स्वतः | १०० | २५% |
|  | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की, एकल महिलांचा अभ्यास करताना त्या एकल महिला कुठल्या ठिकाणी राहतात याचा अभ्यास करताना ११५(२८.८%) महिला आपल्यामाहेरी आई-वडिलाकडे राहतात.तर २(०.५%) महिला या आपल्या भावाकडे राहतात.तसेच २(०.५%) एकल महिला या इतर ठिकाणी राहतात.या ४०० एकल महिला पैकी १८१(४५.३%) एकल महिला या आपल्या सासरीच पण वेगळ्या राहतात व १००(२५%) एकल महिला या स्वतंत्र म्हणजेच स्वत: वेगळ्या ठिकाणी राहतात.

Gramin Vikas Kendra

२३) किती वर्षापासून राहाता

एकल महिलांचा अभ्यास करताना या एकल महिलांच्या कुटुंबाचा अभ्यास करण्या बरोबरच त्या एकल महिला कुठल्या ठिकाणी राहतात या गोष्टीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.तसेच या महिला एकल असल्यामुळे काही महिला या उदरनिर्वाहासाठी दुसऱ्या ठिकाणी राहण्यासाठी आलेल्या असतात.किवा काही कारणास्तव या महिला सध्या कुठे राहतात व किती वर्षापासून राहतात या विषयी अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | वर्ष | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १-५ | ५७ | १४.३% |
| २ | ६-१० | ५५ | १३.८% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | ११-१५ | ४३ | १०.८% |
| ४ | १६-२० | ३७ | ९.३% |
| ५ | २१-२५ | ३७ | ९.३% |
| ६ | २६ पेक्षा जास्त | ९५ | २३.८% |
| ७ | सांगता येत नाही | ७५ | १८.८% |
| ८ | लागु नाही | १ | ०.३% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की,एकल महिला आपल्या पती पासून विभक्त झाल्यानंतर किवा पती मरण पावल्यानंतर जर विभक्त राहत असेल तरती एकल महिला किती वर्षापासून विभक्त राहते याचा अभ्यास करताना ५७(१४.३%)एकल महिला १-५ वर्षापासून विभक्त राहतात.तर ५५(१३.८%)महिला या ६-१० वर्षापासून विभक्त राहतात.तसेच ४३ (१०.८%) एकल महिला या ११-१५ वर्षापासून तर ३७(९.३%)एकल महिला १६-२० वर्षापासून विभक्त राहतात.४०० एकल महिला पैकी ३७(९.३%) एकल महिला या २१-२५ वर्षापासून विभक्त राहतात.तसेच २६ वर्षा पेक्षा जास्त काळ विभक्त राहणाऱ्या महिलांची संख्या ९५(२३.८%) आहे.तर आपण विभक्त किती वर्षापासून विभक्त राहतो याची माहिती सांगता न येणाऱ्या एकल महिलांची संख्या ७५(१८.८%)आहे.तसेच हा प्रश्न लागू नसणाऱ्या एकल महिलांची संख्या १(०.३%) आहे.अशा प्रकारची माहिती समोर आली आहे.

२४) सासरी न राहण्याचे कारण

एकल महिलांचा अभ्यास करताना या एकल महिलांच्या कुटुंबाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.तसेच या महिला एकल असल्यामुळे त्या सध्या कुठे राहतात या विषयी अभ्यास करणे गरजेचे आहे.तसेच या एकल महिला जर त्यांच्या सासरच्या कुटुंबापासून विभक्त राहत असतील तर त्याचे काय कारण आहे या गोष्टीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | कारण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पती सोबत भांडण | ३० | ७.५% |
| २ | सासरचा जाच | ४७ | ११.८% |
| ३ | पतीचा मृत्यू | ४ | १.०% |
| ४ | पतीने सोडुन दिले | ६७ | १६.८% |
| ५ | पती व्यसनी आहे | ३ | ०.८% |
| ६ | पतीने दुसरे लग्न केले | १९ | ४.८% |

Gramin Vikas Kendra

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | इतर | ९ | २.३% |
| ८ | माहिती दिली नाही | १ | ०.३% |
| ९ | लागु नाही | २२० | ५५% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की, एकल महिलांचा अभ्यास करताना त्या एकल महिला सासरी न राहत नाही.त्या आकल महिला सासरी न राहण्याच्या कारणाचा अभ्यास करताना  असे आढळले की पती सोबत भांडण झाल्याने ३०(७.५%) एकल महिला सासरी राहत नाही.तर सासरच्या जाचामुळे ४७(११.८%) महिला या सासरी राहत नाही.तसेच पतीचा मृत्यू झाल्याने ४(१.०%) महिला,पतीने सोडून दिल्याने ६७(१६.८%),पती व्यसनी असल्याने ३(०.८%),पतीने दुसरे लग्न केल्याने १९(४.८%)महिला या सासरी राहत नाही.तर इतर कारणामुळे ९(२.३%)महिला सासरी राहत नाही.माहिती न देणाऱ्या एकल महिलांची संख्या १(०.३%) आहे.तर हा प्रश्न लागू नसणाऱ्या महिलांची संख्या २२०(५५%) आहे.

२५) पतीच्या मृत्यूचे कारण

एकल महिलांचा अभ्यास करताना या एकल महिलांच्या कुटुंबाचा अभ्यास करणे गरजेच आहे.तसेच ती एकल महिला विधवा असल्यास तिच्या पतीचे मृत्यू कशामुळे झाले आहे याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | कारण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आजारीपण | १७६ | ४४% |
| २ | दारू पिल्यामुळे | ४३ | १०.८% |
| ३ | अपघात | ८३ | २०.८% |
| ४ | आत्महत्या | ४ | १% |
| ५ | इतर | १ | ०.३% |
| ६ | लागू नाही | ९१ | २२.८% |
| ७ | खुण | २ | ०.५% |
| | एकूण | ४०० | १००% |

Gramin Vikas Kendra

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल महिला हि जर विधवा असल्यास त्या विधवा महिलेच्या पतीच्या मृत्यूचे काय कारण आहे याचा अभ्यास करताना पती आजाती असल्याने १७६(४४%) महिलांच्या पतीचे मरण झाले आहे असे आढळले आहे.तर दारू पिल्यामुळे ४३(१०.८%)महिलांच्या ,अपघातामुळे ८३(२०.८%) विधवा महिलांच्या पतीचा मृत्यू झाला आहे.तसेच आत्महत्या केल्याने ४(१%) महिलांच्या पतीचा तर इतर कारणामुळे १(०.३%)महिलांच्या,व खून झाल्याने २(०.५%) महिलांच्या पतीचा मृत्यू झालेला आहे.तसेच हा प्रश्न ९१(२२.८%) एकल महिलांना लागू नाही असे समोर आले आहे.

२६) पतीच्या मृतूचा दाखला आहे का

एकल महिलांचा अभ्यास करताना या एकल महिलांच्या कुटुंबाचा अभ्यासताना जा ती एकल महिला विधवा असेल तर तिच्या पतीचा मृत्यूचा दाखला आहे का नाही याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.कारण अनेक शासकीय योजनासाठी किवा वारसा हक्क नोदिसाठी किवा इतर कारणासाठी हा दाखला आवश्यक आहे. म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | दाखला | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २७१ | ६७.८% |
| २ | नाही | ३७ | ९.३% |
| ३ | लागु नाही | ९२ | २३% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल महिलांचा अभ्यास करताना एकल विधवा असणाऱ्या महिलांच्या पतीचा मृत्यू झालेला असल्याने त्या विधवा महिलेकड तिच्या पतीचा मृत्यूचा दाखला आहे की नाही याचा अभ्यास करताना २७१(६७.८%) विधवा महिलांकडे मृत्यू दाखला आहे.तर ३७(९.३%) विधवा महिलांकडे मृत्यू दाखला नाही तर ९२ एकल महिलांना हा प्रश्न लागू नाही.

२७) उपयोगीतेचे साधन/उपजीविका

एकल महिलांचा अभ्यास करताना त्या महिलांचे सद्याचे उपजीविकेचे साधन कोणते साधन आहे याचा आभ्यास करणे गरजेचे ठरते.कारण पती नसताना किवा पतीपासून विभक्त झाल्यानंतर ती महिला कश्या पद्धतीने किवा कश्या पद्धतीने उपजीविका करते या गोष्टीला तिच्या जीवनमान सुधारण्यामध्ये खूप महत्त्व प्राप्त होते.याच मुळे आभायास्काने हा प्रश्न अभ्यासासाठी निवडला आहे.

| अ.क्र. | साधन | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मजुरी | ३४८ | ८७% |
| २ | शेती | ६ | १.५% |
| ३ | व्यवसाय | ७ | १.८% |
| ४ | नोकरी | ८ | २% |
| ५ | इतर | १ | ०.३% |
| ६ | काही नाही | ४ | १% |
| ७ | घरच्यावर अवलंबून | २६ | ६.५% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते कि,या निवडलेल्या क्षेत्रात एकल महिलांची संख्या ४०० आहे.त्या त्यामध्ये मजुरी करणाऱ्या महिलांची संख्या ४०० पैकी ३४८(८७%) आहे.शेती करणाऱ्या महिलांची संख्या ६ (१.५%) आहे.व्यवसाय करणाऱ्या महिलांची संख्या ७ (१.८%) आहे.नोकरी करणाऱ्या महिलांची संख्या ८ (२%) आहे.इतर व्यवसाय करणाऱ्या महिलांची संख्या १(०.३%) आहे.तसेच काहीच उपजीविकेचे साधन नसणाऱ्या महिलांची संख्या ४(१%) आहे.तर घरच्यांवर अवलबून असणाऱ्या महिला २६(६.५%) आहे. .

Gramin Vikas Kendra

म्हणजेच वरील अभ्यासातून  निवडलेल्या कार्यक्षेत्रात मजुरी करणाऱ्या  महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे हे निदर्शनात येते.

२८) सरकारी योजना लाभ

एकल महिलांचा अभ्यास करताना ज्या एकल महिला आहेत या महिलांसाठी शासन अनेक योजना राबवते त्या योजनाचा या महिलांनी लाभ घेतला आहे का किवा नाही.तसेच या योजना मधून अनेक एकल महिलांना अनेक मोठे आर्थिक सहकार्य मिळाल्यास त्यांचा मोठ्या प्रमाणावर विकास होऊ शकतो. याबाबत अभ्यास करणे गरजेचे आहे.म्हणून अभ्यासकांनी हा प्रश्न अभ्यासाठी निवडला आहे.

| अ.क्र. | योजना मिळाली | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११५ | २८.८% |
| २ | नाही | २८५ | ७१.२% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल महिलांनी जीवन जगताना आपल्या विकासासाठी शासनाकडून कुठल्याही सरकारी योजनेचा लाभ घेतला आहे किंवा नाही याचा अभ्यास करताना ४०० एकल महिला पैकी ११५(२८.८%) एकल महिलांनी सरकारी योजनेचा लाभ घेतला आहे.तर २८५(७१.२%) एकल महिलांनी कुठल्याही सरकारी योजनाचा लाभ घेतला नाही असे यातून समोर आले आहे.

Gramin Vikas Kendra

२९) कोणत्या योजनेचा लाभ मिळाला

एकल महिलांचा अभ्यास करताना ज्या एकल महिला आहेत या महिलाच्या विकासाठी शासन अनेक योजना राबवते त्या योजनाचा या महिलांनी लाभ घेतला आहे का किवा नाही.तसेच घेतला असल्यास या एकल महिलांना कोणत्या शासकीय योजनाचा लाभ मिळाला आहे.याबाबत अभ्यास करणे गरजेचे आहे.म्हणून अभ्यासकांनी हा प्रश्न अभ्यासाठी निवडला आहे

| अ.क्र. | योजनेचा लाभ | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | घरकुल | १७ | ४.३% |
| २ | डोल | १९ | ४.८% |
| ३ | गॅस | २ | ०.५% |
| ४ | विधवा अनुदान | १३ | ३.३% |
| ५ | शिलाई मशीन | २८ | ७% |
| ६ | कोणत्याच योजनेचा लाभ नाही | ४ | १% |
| ७ | योजनेचा लाभ घेतला नाही | २८४ | ७१% |
| ८ | संजय गांधी निराधार | ३३ | ८.३% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की ,एकल महिलांचा अभ्यास करताना एकल महिलांनी जर सरकारी योजनाचा लाभ घेतला असल्यास त्या एकल महिलांनी कुठल्या सरकारी योजनाचा लाभ घेतला आहे याचा अभ्यास करताना घरकुल योजनाचा लाभ घेणाऱ्या एकल महिलांची संख्या १७(४.३%)आहे तर डोल योजनाचा लाभ १९(४.८%) एकल महिलांनी,गॅस योजनेचा लाभ घेणाऱ्या एकल महिलांची संख्या २(०.५%) आहे.तसेच विधवा महिलांसाठी असणारे अनुदान १३(३.३%) एकल महिलांनी घेतले आहे.तर शिलाईमशीन घेणाऱ्या महिलांची संख्या २८(७%),संजय गांधी निराधार योजनाचा लाभ ३३(८.३%) एकल महिलांनी घेतला आहे.तर२८४(७१%)एकल महिलांनी कुठल्याही योजनाचा लाभ घेतला नाही असे या अभ्यासामधून समोर आले आहे.

३०) कर्ज कशासाठी घेतले

एकल महिलांचा अभ्यास करताना त्या महिलांच्या आर्थिक बाबीचा विचार करणे गरजेचे आहे.कारण या महिला या पतीपासून दूर झालेल्या असतात किवा त्या महिलांच्या पती मरण पावलेला असल्यामुळे किवा इतर कारणामुळे त्या एकल असतात.त्यामुळे त्या महिलांची आर्थिक स्थितीवर त्या महिलांचा विकास अवलबून

असतो.तसेच या महिलांनी कर्ज घेतलेले असल्यास ते कर्ज नक्की कशासाठी घेतले आहे या गोष्टीचा आभ्यास करणे गरजेचे असते त्यामुळे हा प्रश्न अभ्यास कर्त्यांनी अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | कर्ज घेण्याचे कारण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आजारी पणासाठी | २० | ५% |
| २ | मुलांचे शिक्षण | २१ | ५.३% |
| ३ | व्यवसाय | ९ | २.३% |
| ४ | लग्न | १४ | ३.५% |
| ५ | कुटुंबातील इतर गरज | २० | ५% |
| ६ | कर्ज घेतले नाही | ३०६ | ७६.५% |
| ७ | इतर | ९ | २.३% |
| ८ | लागू नाही | १ | ०.३% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल महिलांनी आपल्या विकासाठी किंवा आपल्या अडचणी सोडवण्यासाठीकिवा कुठल्यातरी कारणामुळे एकल महिलांनी कर्ज घेतले असल्यास ते कर्ज कश्यासाठी घेतले आहे याचा अभ्यास करताना या ४०० एकल महिला पैकी २०(५%) एकल महिलांनी आजार पणासाठी,२१(५.३%) एकल महिलांनी मिलानच्या शिक्षणासाठी,९(२.३%)एकल महिलांनी व्यवसायासाठी,१४(३.५%)एकल महिलांनी लग्नासाठी,२०(५%) एकल महिलांनी कुटुंबातील इतर गरजासाठी , ९(२.३%) एकल महिलांनी इतर कारणासाठी कर्ज घेतले आहे.तर १(०.३%) महिलांना हा प्रश्न लागू नाही.तसेच ३०६(७६.५%) एकल महिलांनी कुठल्याही प्रकारचे कर्ज घेतलेले नाही असे अभ्यासामधून समोर आले आहे.

३१) कर्ज घेतले असल्यास पुढिलपैकी कोणाकडून घेतले

एकल महिलांचा अभ्यास करताना या एकल महिलांच्या कुटुंबाच्या आर्थिक बाबीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.कारण त्या कुटुंबाची प्रगती आर्थिक बाबीवर अवलबून असते.या एकल महिलांनी काही कारणास्तव कर्ज घेतले असल्यास ते कर्ज नक्की कोणाकडून घेतले आहे या गोष्टीचा अभ्यास करणे गरजेचे आहे त्यामुळे अभ्यासकर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासाठी घेतला आहे.

| अ.क्र. | कर्ज घेतल्याचे स्वरूप | महिलांची संख्या | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | सावकार | ४०० | ९ | २.२५% |
| २ | बचत गट | ४०० | २५ | ६.२५% |
| ३ | नातलग | ४०० | ८ | २% |



Gramin Vikas Kendra

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | मित्र मैत्रिणी | ४०० | ४ | १% |
| ५ | बँक | ४०० | १२ | ३% |
| ६ | पतसंस्था | ४०० | ८ | २% |
| ७ | मायक्रो फाय्नास | ४०० | ४९ | १२.२५% |
| ८ | इतर | ४०० | ६ | १.५% |
| ९ | माहिती सांगितली नाही | ४०० | १ | ०.२५% |
| १० | लागु नाही | ४०० | ३०२ | ७५.५% |
| | एकूण | | ४२४ | |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की.एकल महिलांनी कर्ज घेतले असल्यास नक्की कोणाकडून घेतले आहे याचा अभ्यास करताना सावकाराकडून कर्ज घेणाऱ्या एकल महिलांची संख्या ९(२.२५%),बचत गटाकडून कर्ज घेणाऱ्या एकल महिलांची संख्या २५(६.२५%),नातलगाकडून कर्ज घेणाऱ्या एकल महिलांची संख्या ८(२%),मित्र-मैत्रीण यांच्याकडून कर्ज घेणाऱ्या एकल महिलांची संख्या ४(१%),बँकांकडून कर्ज घेणाऱ्या एकल महिलांची संख्या१२(३%),पतसंस्था कडून कर्ज घेणाऱ्या एकल महिलांची संख्या८(२%),मायक्रोफायनांस कडून कर्ज घेणाऱ्या एकल महिलांची संख्या ४९(१२.२५%),इतर ठिकाणाहून कर्ज घेणाऱ्या एकल महिलांची संख्या ६(१.५%),माहिती न सांगणाऱ्या एकल महिलांची संख्या १(०.२५%)आहे.तर ३०२(७५.५%)एकल महिलांना हा प्रश्न लागू होत नाही किवा त्यांनी कर्ज घेतले नाही असे समोर आले आहे.

३२) कर्जाची परत फेड कशी करता

एकल महिलाच अभ्यास करताना एकल महिलांच्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.कारण या एकल महिलांनी कुठल्याना-कुठल्या कामासाठी कोणाकडून तरी कर्ज घेतलेले असते.हे कर्ज आणि त्या महिलांचे आर्थिक उत्पन्न या गोष्टी खूप महत्त्वाच्या आहे.तसेच हे घेतलेले कर्जाची परत फेड कश्या पद्धतीने केली जाणार आहे या विषयी अभ्यास करणे गरजेचे ठरते.म्हणून अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतलेला आहे.

| अ.क्र. | परत फेड | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | साप्ताहिक हप्ता | १ | ०.३% |
| २ | मासिक हप्ता | ४२ | १०.५% |
| ३ | वार्षिक हप्ता | ३८ | ९.५% |
| ४ | इतर | ७ | १.८% |



Gramin Vikas Kendra

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | लागू नाही | ३१२ | ७८% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात आले की,ज्या एकल महिलांनी कुठल्याही कारणासाठी कर्ज घेतले असेल तर त्या कर्जाची त्या महिला कश्या पद्धतीने परत फेड कोणत्या प्रकारे करतात याचा अभ्यास करताना १(०.३%) एकल महिला साप्ताहिक हप्त्याने भरणा करून आपले कर्ज फेडत आहे. ४२(१०.५%) एकल महिला या मासिक हप्त्याने तर ३८(९.५%) एकल महिला वार्षिक हप्त्याने भरणा करून आपले कर्ज फेडत आहे.व ७(१.८%) एकल महिला या इतर पद्धतीने कर्जाच्जी परत फेड करत आहे.तसेच ३१२(७८%) एकल महिलांना हा प्रश्न लागू नाही किंवा त्यांनी कुठल्याही प्रकारचे कर्ज घेतले नाही असे या अभ्यासामधून आढळले आहे.

३३) पतीच्या व वडिलांच्या जमिनीत वाटा आहे का

एकल महिलांचा अभ्यास करताना असणाऱ्या एकल महिलाचा तिच्या पतीच्या किवा वडिलांच्या जमिनीमध्ये वाटा आहे किवा नाही या गोष्टीचा अभ्यास करणे गरजेचे आहे कारण या एकल महिलाच्या पती मरण पावलेला असतो किवा ती तिच्या पतीपासून विभक्त झालेली असते किवा इतर कारणामुळे ती एकल असते.पती मरण पावल्यानंतर तिच्या पतीच्या जमिनीमध्ये तिचा वारस हक्क असतो तो तिला दिला आहे का ? किवा ती पतीपासून विभक्त झाल्यानंतर पतीच्या जमिनीमध्ये तिचा अर्धा हिस्सा असतो तो आहे का? किवा ती एकल महिला आपल्या वडिलांकडे राहत असल्यामुळे तिच्या वडिलांच्या जमिनीमध्ये तिचा पण तिच्या इतर भावंडा प्रमाणे हिस्सा असतो तो आहे का? या गोष्टीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यामुळे अभ्यास कर्त्यांनी हा प्रश्न अभ्यासामध्ये घेतला आहे.

| अ.क्र. | कारण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ९२ | २३% |
| २ | नाही | २८९ | ७२.३% |
| ३ | वाटा मिळू शकतो | १२ | ३% |
| ४ | संपत्ती नाही | ६ | १.५% |
| ५ | माहिती सांगितली नाही. | १ | ०.३% |
| | एकूण | ४०० | १००% |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल असणाऱ्या महिलांना आपल्या पतीच्या /सासरच्या किंवा आपल्या माहेरच्या /आई-वडिलांच्या जमिनीमध्ये वाटा



Gramin Vikas Kendra

आहे की नाही याचा अभ्यास करताना ९२(२३%) एकल महिलांचा आपल्या सासरच्या किंवा माहेरच्या जमिनीमध्ये वाटा आहे.तर २८९(७२.३%)एकल महिलांना आपल्या सासरच्या किंवा माहेरच्या जमिनीमध्ये वाटा नाही.तर १२(३%) महिलांना आपल्या सासरच्या किंवा माहेरच्या जमिनीमध्ये वाटा मिळू शकतो.तसेच ६(१.५%) एकल महिलांच्या सासरी किंवा माहेरी जमीन नाहीव १(०.३%) एकल महिलांचा जमिनीमध्ये वाटा आहे किंवा नाही या विषयी माहिती सांगता आली नाही.

३३) तुमच्याकडे खालीलपैकी कोणती मालमत्ता आहे

एकल महिलांचा अभ्यास करताना ज्या एकल महिला आहेत त्यांच्याकडे सद्यस्थितीत कुठल्या प्रकारची मालमत्ता आहे या गोष्टीचा पाहणे गरजेचे आहे.कारण या महिलांकडे असणारी मालमत्तेवर त्यांचा विकास किती प्रमाणामध्ये झाला आहे या गोष्टीचा विचार करू शकतो.तसेच त्यांना कुठल्या गोष्टीची आवश्यकता आहे या दृष्टीने आपणास विचार करता येतो.म्हणून अभ्यास कर्त्याने या गोष्टीचा अभ्यास करणे ठरवले आहे.

| अ.क्र. | मालमत्तेचे स्वरूप | एकूण महिलांची संख्या | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | जमीन | ४०० | ६७ | १६.७५% |
| २ | घर | ४०० | २३९ | ५९.७५% |
| ३ | दागिने | ४०० | २१ | ५.२५% |
| ४ | भांडी | ४०० | २३९ | ५९.७५% |
| ५ | जनावरे | ४०० | २४ | ६% |
| ६ | पैसा | ४०० | २३ | ५.७५% |
| ७ | इतर | ४०० | ३ | ०.७५% |
| ८ | मालमत्ता नाही | ४०० | ७० | १७.५०% |
|  | एकूण |  | ६८६ |  |

वरील सारणी वरून असे लक्षात येते की,एकल महिलांकडे असणाऱ्या मालमत्तेचा अभ्यास करताना एकूण ४०० एकल महिला पैकी २३९(५९.७५%) महिलांकडे घर आहे.तसेच जमीनअसणाऱ्याची संख्या ६७(१६.७५%),दागिने असणाऱ्याची संख्या २१(५.२५%),भांडी असणाऱ्याची संख्या २३९(५९.७५%),जनावरे असणाऱ्याची

Gramin Vikaskendra

संख्या २४(६%),पैसा असणाऱ्याची संख्या २३(५.७५%)आहे.तर इतर मालमत्ता असणाऱ्या एकल महिलांची संख्या ३(०.७५%)आहे.मालमत्ता नसणाऱ्या महिलांची संख्या ७०(१७.७५%)आहे.असे या अभ्यासामधून समोर आले आहे.

३४) शिक्षण ण घेण्याचे कारण

